दिलीप माजगावकर

* ‘राजहंस प्रकाशन’ आणि ‘माणूस’ साप्ताहिकात 1966 मध्ये प्रवेश.

* थोरले बंधू माणूस कार श्री.ग.माजगावकर यांच्या मार्गदर्शनाखाली संपादनापासून मुद्रण-वितरणापर्यंत सर्व जबाबदा-या समर्थपणे सांभाळल्या.

* 1984 पासून ‘राजहंस प्रकाशना’ची सूत्रे हाती घेतली.

* सामाजिक बांधिलकीचे सजग भान, राजकारण-समाजकारण-अर्थकारणापासून ललित साहित्यापर्यंत आणि संगीत-नृत्य-नाटय-चित्रपट-चित्रकला-शिल्पकला यांपासून तत्त्वज्ञान-विज्ञान-पर्यावरणापर्यंत अनेक विषयांमध्ये रस. या सा-यांचे ‘राजहंस प्रकाशना’च्या पुस्तकांमध्ये प्रतिबिंब.

* नव्या, ताज्या दमाच्या लेखकांना प्रोत्साहन. कायम नव्या विषयांचा शोध आणि हाताळणी. वाचकांच्या आवडीची उत्तम जाण. आंतरराष्ट्रीय पातळीवर प्रमाणभूत मानलेली निर्मितीमूल्ये या सा-यांची सुयोग्य सांगड घातलेल्या पुस्तकांचे वाचकांकडून भरभरून स्वागत.

* ‘राजहंस प्रकाशना’च्या कायमस्वरूपी प्रतिनिधींची महाराष्ट्रात विविध ठिकाणी नेमणूक. त्या योगे पुस्तक वितरणाचे महाराष्ट्रभर जाळे. या केंद्रांतर्फे विविध सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन.

* ‘राजहंस प्रकाशन’ ही मराठी पुस्तक विश्वात अग्रगण्य प्रकाशन संस्था बनवण्यात महत्त्वाचा वाटा.

*****